**पंचायत समितीची मासिक सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक १७/०६/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता पंचायत समिती कार्यालय श्रीवर्धन महाराष्ट्र भूषण आदरणीय तीर्थ.डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी सभागृह येथे घेणेंत आली. त्या सभेचे इतिवृत्त भाग-१ व २**

जा.क्र.पंसश्री/प्रशासन/वशी/१/        /२०२६
पंचायत समिती कार्यालय, श्रीवर्धन
दिनांक        /        /२०२६

प्रति,

मा.श्री/श्रीमती.........................................................................................
पंचायत समिती सभापती/उपसभापती/सदस्या/सदस्य
मु.पो..............................................तालुका श्रीवर्धन, जि.रायगड

प्रत- माहितीसाठी सविनय सादर.

१. मा. खासदार श्री. सुनिलजी तटकरे साहेब, गीताबाग मु.सुतारवाडी पो.जामगांव, ता.रोहा, जि.रायगड
२. मा. आमदार कु.अदिती सुनिल तटकरे मॅडम,गीताबाग मु.सुतारवाडी पो.जामगांव, ता.रोहा,जि.रायगड
३ मा. अध्यक्ष सो. रायगड जिल्हा परिषद अलिबाग.
४. मा. उपाध्यक्ष सो. रायगड जिल्हा परिषद अलिबाग.
५. मा. सभापती सो...............................................समिती रायगड जिल्हा परिषद अलिबाग
६. मा. विरोधी पक्षनेता रायगड जिल्हा परिषद अलिबाग.
७. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद अलिबाग.
८. मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद अलिबाग.
९. मा. खाते प्रमुख (सर्व)................................................................रा.जि.प. अलिबाग.

प्रत:- माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

-------------------------------------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------------------------------------

प्रत :- पंचायत समितीमधील सर्व शाखा प्रमुख, शाखा / कनिष्ठ अभियंता (बांधकाम /एस्.एस्.ए.)
सहाय्यक / कनिष्ठ लेखाधिकारी, कृषि अधिकारी (जनरल /वि.घ.यो.)
विस्तार अधिकारी (सर्व)......................................पंचायत समिती श्रीवर्धन.

सचिव तथा गट विकास अधिकारी (वर्ग - १)
पंचायत समिती श्रीवर्धन

**पंचायत समितीची मासिक सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक १७/०६/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता पंचायत समिती कार्यालय श्रीवर्धन महाराष्ट्र भूषण आदरणीय ती.डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी सभागृह येथे घेणेंत आली. त्या सभेचे इतिवृत्त भाग-१ व २**

**इतिवृत्त भाग १**

| सभेची तारीख व वेळ | उपस्थित सदस्य | उपस्थित अधिकारी / कर्मचारी |
|---|---|---|
| दिनांक १७/०६/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता | १) मा.श्री. सचिन नंदाकर किर सो.<br>सभापती पंचायत समिती.<br>२) मा.श्रीम.पुजा प्रशांत शिंदे सो.<br>उपसभापती पंचायत समिती<br>३) मा.श्री. सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर सो.<br>पंचायत समिती सदस्य<br>४) मा.श्रीम. अस्मिता प्रदर्शन चोरगे<br>पंचायत समिती सदस्य | १) सचिव तथा गट विकास अधिकारी,पं.स.श्रीवर्धन<br>२) पशुधन विकास अधिकारी, पं.स.श्रीवर्धन<br>३) तालुका आरोग्य अधिकारी,श्रीवर्धन<br>४) उपअभियंता (ग्रा.पा.पु.),रा.जि.प.उपविभाग,म्हसळा<br>५) उपअभियंता (बांध.) (प्र),रा.जि.प.उपविभाग,श्रीवर्धन<br>६) बाल विकास प्रकल्प अधिकारी, ए.बा.वि.से.यो.श्रीवर्धन<br>७) गट शिक्षणाधिकारी (प्र),पं.स.श्रीवर्धन<br>८) तालुका कृषी अधिकारी,श्रीवर्धन (प्रतिनिधी)<br>९) विस्तार अधिकारी (पंचायत) १ पं.स.श्रीवर्धन<br>१०) विस्तार अधिकारी (आरोग्य) (प्र.),पं.स.श्रीवर्धन<br>११) विस्तार अधिकारी (कृषी) (प्र.),पं.स.श्रीवर्धन<br>१२) सहाय्यक लेखाधिकारी,पं.स.श्रीवर्धन (प्रतिनिधी)<br>१३) शाखा अभियंता,पं.स.श्रीवर्धन (प्रतिनिधी)<br>१४) कनिष्ठ अभियंता,पं.स.श्रीवर्धन<br>१५) सहाय्यक प्रशासन अधिकारी, (प्र) पं.स.श्रीवर्धन<br>१६) कनिष्ठ प्रशासन अधिकारी,पं.स.श्रीवर्धन<br>१७) पशुधन पर्यवेक्षक,पं.स.श्रीवर्धन.<br>१८) गटसन्वयक (MSRLM) (प्र.) ,पं.स.श्रीवर्धन<br>१९) कनिष्ठ सहाय्यक (प्रशासन),पं.स.श्रीवर्धन |

**पंचायत समितीची मासिक सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक १७/०६/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता पंचायत समिती कार्यालय श्रीवर्धन महाराष्ट्र भूषण आदरणीय तीर्थ.डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी सभागृह येथे घेणेंत आली. त्या सभेचे इतिवृत्त भाग-१ व २**

## संक्षिप्त इतिवृत्त भाग-१

सभेच्या प्रारंभी मा.श्रीम.अस्मिता प्रदर्शन चोरगे सो.पं.स.सदस्या श्रीवर्धन यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण केला व सर्वानी राष्ट्रगीत / महाराष्ट्र गीत म्हटले.

श्री.राजू दुंदा किरवे सचिव तथा गट विकास अधिकारी यांनी पंचायत समितीचे सर्वसाधारण सभेस उपस्थित मा.श्री. सचिन नंदाकर किर सो.सभापती, मा. श्रीम.पुजा प्रशांत शिंदे सो. उपसभापती, मा. श्री. सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर सो, पं.स.सदस्य, मा.श्रीम. अस्मिता प्रदर्शन चोरगे सो, पं.स.सदस्या, यांचे पंचायत समितीच्या वतीने स्वागत केले तसेच सभेस उपस्थित सर्व खाते प्रमुख, अधिकारी व कर्मचारी यांचे पंचायत समितीच्या वतीने स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात करावी अशी विनंती मा.सभापती सो यांना केली.

मा.श्री. सचिन नंदाकर किर सो., सभापती यांनी सभेस उपस्थित मा.श्रीम.पुजा प्रशांत शिंदे सो.उपसभापती, मा. श्री. सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर सो. पं.स.सदस्य, मा.श्रीम. अस्मिता प्रदर्शन चोरगे,पं.स.सदस्या, मा.श्री.राजू दुंदा किरवे गट विकास अधिकारी तथा सचिव यांचे पंचायत समितीच्या वतीने स्वागत केले तसेच उपस्थित सर्व खातेप्रमुख अधिकारी व कर्मचारी यांचे देखील पंचायत समितीच्या वतीने स्वागत केले. त्यानंतर मा.सभापती यांनी गट विकास अधिकारी तथा सचिव यांना सभेचे कामकाजास सुरूवात करणेबाबत सुचित केले.

सर्व प्रथम मागील सभेमध्ये सुचित केल्या प्रमाणे श्रीवर्धन तालुक्यातील इयत्ता १० वी व १२ वी मध्ये विशेष यश संपादन केलेल्या प्रथम तीन क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. तद्नंतर तालुक्यातून महाराष्ट्र पोलीस दलामध्ये तसेच भारतीय सेना दलामध्ये भरती झालेल्या तरूण / तरूणींचा प्रशस्तीपत्रक व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच रा.जि.प शाळा भरडखोल येथील विद्यार्थी, विद्यार्थीनी व शिक्षक हे पंचायत समिती श्रीवर्धन येथील राष्ट्रीय कार्यक्रमास नियमित उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवितात याबद्दल त्यांचा ही विशेष गौरव व सन्मान करण्यात आला.

## दु:खवटा ठराव

१) बोर्ली येथील व्यापारी कै. श्री.प्रकाश शहा यांचे दिनांक २६/०५/२०२६ रोजी आकस्मिक निधन झालेबद्दल.
२) शेकापचे कार्यकर्ते कै. श्री.शरद भाटकर यांचे दिनांक १६/०६/२०२६ रोजी आकस्मिक निधन झालेबद्दल.

दु:खद निधन झालेल्या व्यक्तीच्या मृतात्म्यास चिरशांती लाभावी म्हणून सभागृहात श्रध्दांजली वाहणेत आली.

## अभिनंदन ठराव

श्री.अनिकेत वरदा सुनिल तटकरे यांची (विधान परिषदेमध्ये आमदार म्हणून बिनविरोध निवडून आल्या बद्दल) पंचायत समिती सभा सर्वानुमते अभिनंदन ठराव घेण्यात आला.

**विषय क्र १ :-** मागिल मासिक सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
मागिल मासिक सभेचे इतिवृत्ताचे वाचन श्री.राजू दुंदा किरवे सचिव तथा गट विकास अधिकारी यांनी केले व ते सर्वानुमते मंजूर करणेंत आले.

**विषय क्र २ :-** मागिल मासिक सभेतील ठराव पूर्ततेचा आढावा घेणे.
मागिल मासिक सभेतील ठरावावरील व चर्चेवरील केलेल्या कार्यवाहीचे वाचन श्री.राजू दुंदा किरवे सचिव तथा गट विकास अधिकारी यांनी केले व ठराव पूर्ततेचा आढावा घेणेंत आला.

**विषय क्र ३ :-** मा.सदस्यांनी विचारलेल्या लेखी प्रश्नांना उत्तरे देणे.
मा.सदस्यांचे लेखी प्रश्न नव्हते.

**विषय क्र ४ :-** मा.सदस्यांचे रजेचे अर्ज मंजूर करणे.
मा.सदस्यांचे रजेचे अर्ज नव्हते.

**विषय क्र ५ :-** महत्वाच्या पत्रव्यवहाराचे वाचन करणे.
महत्वाचे पत्रव्यवहार वाचनासाठी नव्हते.

**विषय क्र. ६ :-** तालुक्यातील खाते प्रमुखांकडील विकास कामांचा आढावा घेणे.

**पशुसंवर्धन :-** पशुधन विकास अधिकारी हे सभेस उपस्थित न राहिल्याने त्यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला घेता आला नाही.

**तालुका आरोग्य अधिकारी :-** श्री.नरेश खोत तालुका आरोग्य अधिकारी प्रतिनिधी यांनी त्यांच्या विभागाचा आढावा दिला.

यानंतर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी पावसाळ्या संदर्भात काय उपाययोजना करण्यात आल्या आहेत या बाबत माहिती विचारली.

यावर श्री.नरेश खोत यांनी आरोग्य विभागामार्फत करण्यात आलेल्या उपाययोजना बाबत संक्षिप्त माहिती दिली.

तालुका आरोग्य अधिकारी हे सभेस अनुपस्थित राहिल्या बाबत श्री.तोंडलेकर यांनी नाराजी व्यक्त केली तसेच त्यांना कारणे दाखवा नोटीस द्यावी असे सांगितले.

**तालुका कृषी :-** तालुका कृषी अधिकारी श्रीम.श्रध्दा डुंबरे यांनी कृषी विभागाचा आढावा पुढील प्रमाणे दिला. कृषी विभागामार्फत योजनेचा लाभ घेण्यासाठी फार्मर ID आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. फार्मर ID असणारा कोणताही शेतकरी लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज सादर करू शकतो तसेच सदर योजने अंतर्गत प्रथम अर्ज करणाऱ्याला प्राधान्य दिले जाते असे त्यांनी सांगितले. अनुदानाचा लाभ घेण्यासाठी दोन निकष असल्याचे सांगताना जर २ हेक्टर क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्र असणारा शेतकरी / महिला असेल तर त्यांना ५०% अनुदान मिळते आणि २ हेक्टर पेक्षा जास्त क्षेत्र असणाऱ्या शेतकऱ्यांना ४०% अनुदानाचा लाभ मिळतो असे सांगितले. ट्रॅक्टरसाठी साधारणत: १ लाख रूपये अनुदान दिले जाते आणि जर लाभार्थी लहान शेतकरी किंवा अनु.जाती/ अनु.जमाती प्रवर्गातील असेल तर १,२५,०००/- रूपयांपर्यंत अनुदानाचा लाभ लाभार्थ्यांना मिळतो. सदर अनुदान आयुक्त स्तरावरून लाभार्थ्यांच्या खात्यात थेट हस्तांतरित केले जाते असे त्यांनी सांगितले.

त्यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी लहान शेतकरी या अटीमध्ये सामाविष्ठ होण्यासाठी संबंधित शेतकऱ्याचे क्षेत्र २ हेक्टरपेक्षा किती कमी असावे असे विचारले.

त्यावर श्रीम.श्रध्दा डुंबरे यांनी किमान क्षेत्राची कोणतीही अट नसल्याचे सांगितले.

त्यानंतर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर कीर यांनी ट्रॅक्टर व्यतिरिक्त अन्य कोणत्या उपकरणांसाठी शेतकऱ्यांना अनुदानाचा लाभ मिळतो असे विचारले.

त्यावर श्रीम.श्रध्दा डुंबरे यांनी ट्रॅक्टर, पॉवर डिलर, स्प्रेअर तसेच कटर सारखी विविध उपकरणे खेरदी करण्यासाठी शेतकऱ्यांना अनुदानाचा लाभ मिळतो असे सांगितले. तसेच MRGS ही एकमेव योजना ऑफलाईन स्वरूपात असुन कृषी विभागाकडून सदर योजनेचे अर्ज स्विकारून ते पंचायत समितीकडे हस्तांतरित केले जातात असे सांगितले.

त्यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी किती शेतकऱ्यांच्या नुकसानीचा पंचनामा प्रक्रिया पुर्ण झाली आहे असे विचारले.

यावर श्रीम.श्रध्दा डुंबरे यांनी १७५० आंबा उत्पादक आणि ३६० काजू उत्पादक शेतकऱ्यांच्या नुकसानीचा पंचनामा करून सदर यादी जिल्ह्याला पाठविली असल्याचे सांगितले.

त्यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी शेतकऱ्यांना साधारणत: किती नुकसानभरपाई अनुदान मिळते असा प्रश्न विचारला.

त्यावर श्रीम.श्रध्दा डुंबरे यांनी हेक्टरी २२,५०० रूपये प्रमाणे अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यात थेट हस्तांतरित केले जातात असे सांगितले.

त्यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी कोकण भागातील शेतकरी अल्पभुधारक आहेत त्यामुळे त्यांना अनुदान कसे वितरीत केले जाते असे विचारले.

त्यावर श्रीम.श्रध्दा डुंबरे यांनी प्रत्येक शेतकऱ्याच्या खात्यावर किमान २५०० रूपये हस्तांतरित केलेच जातात असे सांगितले.

**उप विभाग बांधकाम :-** श्री. स्वप्निल आंधळे यांनी उप विभाग बांधकाम चा संक्षिप्त आढावा दिला.

त्यामध्ये त्यांनी बोर्ली येथील प्रा.आ.केंद्राची इमारत धोकादायक बनली असून त्यासाठी नवीन जागेची पाहणी करण्यात आल्याचे व आवश्यक उपाययोजना सुरू असल्याचे सांगितले.

त्यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी सदरची इमारत ही कधी बांधण्यात आली होती असे विचारले.

यावर श्री. स्वप्निल आंधळे यांनी साधारणत: सन २००९-१० या वर्षी सदर बांधकाम झाले असावे असे सांगितले.

त्यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी पंधरा वर्षात इमारत जर धोकादायक स्थितीस पोहोचली असेल तर इमारतीचे काम निकृष्ठ दर्जाचे आहे असे मत व्यक्त केले.

त्यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर कीर यांनी सदर कामाचे ठेकेदार कोण आहेत असे विचारले.

यावर श्री.स्वप्निल आंधळे यांनी सदर काम हे खुप जुने असल्यामुळे या बाबत त्यांना माहिती नसल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी वडशेत वावे या रस्त्याचे काँक्रिटीकरण पुर्ण झाले असून यावरील पुल धोकादायक स्थितीत असल्याचे पत्र संबंधित विभागाकडून देण्यात आल्याचे सांगितले. सदर रत्याचे काम हे पंतप्रधान ग्राम सडक योजने अंतर्गत सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

त्यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी संबंधित रस्त्याच्या कामाचे इस्टीमेट किती आहे असे विचारले

यावर श्री.स्वप्निल आंधळे यांनी सदर कामाचे अंदाजपत्रक साधारणपणे ३.५ कोटी रूपयाचे असल्याचे सांगितले.

त्यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी सदर रस्त्याच्या कामाची पाहणी संबंधित विभागाकडून जेव्हा करण्यात आली होती तेव्हा सदर पुल हा धोकादायक असल्याची बाब त्यांच्या लक्षात आली असून देखील केवळ जबाबदारी न स्विकारण्यासाठी संबंधित ठेकेदाराकडून सदर पत्र देण्यात आल्याची शक्यता असल्याचे सांगितले. तसेच मा.ग.वि.अ यांनी संबंधित गावातील ग्रामसेवक श्री.गोवारी आणि ठेकेदार यांना बोलावून त्यांच्याशी चर्चा करून याबाबत कार्यवाही करावी असे श्री.स्वप्निल आंधळे यांना सांगितले. तसेच बोर्लीमध्ये ही एका छोट्या साकवाचे काम सूरू असताना अशीच समस्या आल्या नंतर संबंधित काम बंद केल्यानंतर पुलाचे काम गुणवत्तापुर्ण करण्याचे अभियंत्याकडून आश्वासन घेऊनच काम करण्यास अनूमती दिल्याचे त्यांनी सांगितले. यानंतर त्यांनी जी कामे पुर्ण झालेली आहेत त्यांची पाहणी करण्यात आली आहे का? असे श्री. स्वप्निल आंधळे यांना विचारले.

त्यावर श्री.स्वप्निल आंधळे हे "होय" म्हणाले.

त्यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी शाळेच्या पहिल्या दिवशी आदिवासीवाडी कार्ले येथील शाळेस ते भेट देण्यास गेले असतांना त्याच वेळी संबंधीत शाळेचा स्लॅप कोसळल्याची गंभीर बाब सांगितली. सुदैवाने विद्यार्थी त्या ठिकाणी नसल्यामुळे मोठी आपत्ती टळल्याचे सांगत याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.

त्यानंतर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर कीर यांनी वडवली येथील ऊर्दू शाळेच्या बाबतही अशीच स्थिती असून मागील दोन वर्षापासून याबाबत पत्र व्यवहार करूनही योग्य कार्यवाही झाली नसल्याचे सांगितले.

यानंतर मा.उपसभापती श्रीम.पुजा प्रशांत शिंदे यांनी आराठी शाळेमध्ये स्लॅप तुटला असून तो कोसळल्यास गंभीर अपघाताची शक्यता निर्माण होऊ शकते त्यामुळे याबाबत वेळीच योग्य कार्यवाही करावी असे सांगितले. कनिष्ठ अभियंता वसीम शेख मागील मासिक सभेस नोटीस बजावली असतानाही वारंवार गैरहजर राहत असल्या बाबत मा. गट विकास अधिकारी यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली तसेच जर शाळेमध्ये स्लॅप कोसळला तर संबंधित अभियंत्यास जबाबदार मानण्यात येईल असे सांगितले.

**राज्य परिवहन महामंडळ:-** आगार प्रमुख श्रीवर्धन यांनी सभेस उपस्थित राहून त्यांच्या विभागाचा आढावा खालील प्रमाणे दिला. उन्हाळ्यामुळे आगारात पिण्याच्या पाण्याची समस्या असून याबाबत मदत करण्याची मागणी त्यांनी केली.

यावर मा.ग.वि.अ यांनी आगारामध्ये साठवण टाकी आहे का असे विचारले.

त्यावर आगार प्रमुख यांनी एक टँकरपेक्षा अधिक क्षमतेची पाण्याची साठवण टाकी असल्याचे सांगितले.

यानंतर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी या समस्येबाबत काय कार्यवाही करता येईल असे विचारले.

यावर आगार प्रमुख यांनी याबाबत वरिष्ठ स्तरावर माहिती देण्यात आली असून काही समस्या उद्भवल्यास त्वरीत महामंडळाची गाडी पाठवली जाते असे सांगितले.

त्यानंतर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर कीर यांनी बसच्या अतीवेगाबाबत चिंता व्यक्त केली व याबाबत वेळीच सुचना देण्यात याव्यात असे सांगितले.

यावर आगार प्रमुख यांनी सर्व चालकांना याबाबत सूचना देण्यात येतील असे सांगितले.

यानंतर मा.सदस्या श्रीम.अस्मिता प्रदर्शन चोरगे यांनी विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून बस वेळेवर सोडण्यात याव्यात असे सांगितले.

यावर आगार प्रमुख "होय" असे म्हणाले.

**म.रा.वि.वि.कं.लि.** :- कनिष्ठ अभियंता श्री.भूषण तेलंग यांनी म.रा.वि.वि.कं.लि चा अहवाल खालील प्रमाणे सादर केला.

यानंतर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी पावसाळ्याची पुर्वतयारी करण्यात आली आहे का? असे विचारले.

यावर श्री.भूषण तेलंग यांनी पावसाळ्यात विद्युत पुरवठा खंडित होऊ नये यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. पाभरे ते श्रीवर्धन या लाईन च्या आसपास असणाऱ्या झाडांच्या फांद्या तोडण्यात आल्या असून बागमांडला, बोर्ली व जांभुळ या आऊट गोईंग फिडरच्या लाईनच्या आसपासही दक्षता घेण्यात आली आहे. श्रीवर्धन पासून ४ फिडर दुरूस्ती अंतिम टप्प्यावर असल्याचे त्यांनी सांगितले. स्मार्ट मीटर बसविण्याचे काम सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

यानंतर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी स्मार्ट मीटर ला एवढा विरोध असण्याचे कारण काय आहे असे विचारले.

यावर श्री.भूषण तेलंग यांनी याबाबत जनतेमध्ये जागृती नसल्याचे सांगितले.

त्यानंतर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर कीर यांनी स्मार्ट मीटर साठी काही अतिरिक्त रक्कम लागते का? असे विचारले.

यावर श्री.भूषण तेलंग यांनी स्मार्ट मीटरसाठी कोणतीही अतिरिक्त रक्कम भरावी लागत नसल्याचे सांगितले.

यानंतर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी जुने मीटर आणि स्मार्ट मीटर यांच्या बीलामध्ये खुप जास्त तफावत असल्याचे सांगितले तसेच ही तफावत का येते असे विचारले.

त्यावर श्री.भूषण तेलंग यांनी सदोष वायरिंग मुळे तसेच वीज गळतीमुळे ही समस्या येऊ शकते असे सांगितले.

यानंतर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी लोकांमध्ये याबाबत जनजागृती व्हावी यासाठी विद्यूत विभागामार्फत कोणते प्रयत्न केले जातात असे विचारले.

त्यावर श्री.भूषण तेलंग यांनी जनजागृतीसाठी जनसंपर्क नावाचा व्हॉट्स ॲप ग्रुप तयार करण्यात आल्याचे सांगितले.

यानंतर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी या ग्रुपमध्ये पंचायत समिती सदस्य तसेच पदाधिकाऱ्यांना समाविष्ठ केले जावे तसेच ग्रामसभेमध्ये कनिष्ठ अभियंत्यांना पाठवून जनजागृती करावी असे सांगितले.

**<u>सार्वजनिक बांधकाम</u>:-** श्री.राजेंद्र सातपूते यांनी उप अभियंता सार्वजनिक बांधकाम विभागाचा आढावा खालील प्रमाणे दिला. सध्या पूर्व मान्सून तयारी सुरू असून नाले सफाई व्यतिरिक्त अन्य कोणतेही काम सुरू नसल्याचे त्यांनी सांगितले.

त्यानंतर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी बांधकाम विभागा मार्फत तालुक्यात कोणती कामे सुरू आहेत असे विचारले.

यावर श्री.राजेंद्र सातपूते यांनी नवीन कोणतेही काम सुरू नसून जुन्या कामामध्ये सध्यास्थितीत न्यायालय इमारत, दिवेआगार व बोर्लीपंचतन येथे पुलाचे काम सुरू असल्याचे सांगितले.

त्यानंतर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी २०२३-२४,२०२४-२५,२०२५-२६ या तीन वर्षात पूर्ण झालेल्या आणि प्रगतीपथावर असणाऱ्या सर्व कामांची परिपुर्ण माहिती पुढील मासिक सभेत सर्व पंचायत समिती सदस्यांना देण्यात याव्यात असे सांगितले.

यावर श्री.राजेंद्र सातपूते हे "होय" असे म्हणाले.

**<u>सार्वजनिक बांधकाम (पर्यटन)</u>:-** उप अभियंता (सा.बां.) यांनी सभेस उपस्थित राहून त्यांच्या विभागाचा आढावा सभागृहाला दिला.

**<u>ए.बा.वि.से.यो</u>:-** श्री.भरत कुबेर वि.अ सांख्यिकी (प्रतिनीधी) बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय यांनी त्यांच्या विभागाचा आढावा खालील प्रमाणे दिला. विभागामार्फत वर्षातून दोन वेळा आरोग्य तपासणी केली जाते. पुढील १५ दिवसांचे आरोग्य तपासणीसाठी Schedule तयार करण्यात आले असुन तालुक्यातील ११ मध्यम कुपोषित बालकांच्या संख्येत ३ ने घट होऊन ८ वर आली आहे. तसेच तालुक्यात एकही बालक अतीतीव्र कुपोषित नसल्याचे त्यांनी सांगितले.

त्यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी कुपोषणाबाबत पाहणी कशी केली जाते असे विचारले.

यावर श्री.भरत कुबेर वि.अ सांख्यिकी यांनी अंगणवाडी सेविका या लहान बालकांच्या वजनाची आणि उंचीची नोंद पोषण ट्रॅकर ॲप मध्ये करतात व त्या आधारे याबाबत निष्कर्ष काढला जातो असे सांगितले.

त्यानंतर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी दिघी व कुडगाव या ठिकाणी अंगणवाडी पर्यवेक्षिका कोण आहेत असे विचारले तसेच आदगांव, दिघी, भरडखोल, कुडगांव या ठिकाणी विशेष लक्ष दिले जावे असे सांगितले.

यावर श्री.भरत कुबेर वि.अ सांख्यिकी यांनी श्रीम.भायदे मॅडम या पर्यवेक्षिका असून संबंधीत ठिकाणी व्यवस्थित लक्ष केंद्रीत केले जाईल असे सांगितले.

त्यानंतर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी काही ठिकाणी लोकांचे अजूनही मागास विचार असून ते घरगुती उपायांवर विसंबून राहतात त्यामुळे कुपोषणाच्या समस्येला सामोरे जावे लागते असे सांगितले.

यानंतर मा.उपसभापती श्रीम.पुजा प्रशांत शिंदे यांनी अंगणवाडी आणि आशा सेविकांना सुयोग्य प्रशिक्षीत केले जाण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. १२ ते १४ आणि १४ ते १८ वयोगटातील मुलींना आरोग्य व पोषणा विषयी व्यवस्थित मार्गदर्शन केल्यास याचा भविष्यात फायदा होऊ शकतो असे त्यांनी सांगितले. तसेच अंगणवाडी सेविकांना व्यवस्थित मार्गदर्शन केल्यास लाभार्थ्यांना त्याचा फायदा होईल असे मत त्यांनी व्यक्त केले.

त्यानंतर मा.सदस्या श्रीम.अस्मिता प्रदर्शन चोरगे यांनी बालकांना योग्य दर्जाचा पोषण आहार पुरविला जातो का असे विचारले.

त्यावर श्री.भरत कुबेर वि.अ सांख्यिकी "होय" म्हणाले.

यावर मा.सदस्या श्रीम.अस्मिता प्रदर्शन चोरगे यांनी अंगणवाडीस भेट दिली असता, पोषण आहारातील वाटाणा कच्चा असल्याचे तसेच डाळीमध्ये खुप जास्त खडे असल्याची बाब निदर्शनास आल्याचे सांगितले. पोषण आहार चांगल्या दर्जाचा असावा आणि अंगणवाडी सेविकांना मदतीसाठी मदतनीस नियुक्त करावेत असे सांगितले.

त्यावर श्री.भरत कुबेर वि.अ सांख्यिकी यांनी या सर्व सुचनांचा गांभिर्याने विचार केला जाऊन त्याबाबत कार्यवाही केली जाईल असे सांगितले.

त्यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी आरोग्य विभाग व एबाविसेयो विभाग यांची एकत्रित बैठक आयोजित केली जावे असे सांगितले.

त्यावर मा.ग.वि.अ यांनी पुढील आठवड्यात दोन्ही विभागांची संयुक्त बैठक घेण्याचे नियोजन करण्याच्या सुचना दिल्या.

यानंतर मा.उपसभापती श्रीम.पुजा प्रशांत शिंदे यांनी "परसबाग" ही संकल्पना राबविण्यात येते का असे विचारले.

त्यावर श्री.भरत कुबेर वि.अ सांख्यिकी यांनी २२ अंगणवाड्यांमध्ये "पोषण वाटीका" ही संकल्पना अत्यंत उत्कृष्ठ पद्धतीने राबविण्यात येत असल्याचे सांगितले.

**प्रादेशीक वन विभाग :-** प्रादेशीक वन अधिकारी हे सभेस उपस्थित न राहिल्याने त्यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला घेता आला नाही.

**सामाजिक वनीकरण:-** वन परिक्षेत्र अधिकारी श्रीवर्धन हे सभेस उपस्थित न राहिल्याने त्यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला घेता आला नाही.

**खारभूमी:-** उप विभागीय अधिकारी खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण उप विभाग श्रीवर्धन हे सभेस उपस्थित न राहिल्याने त्यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला घेता आला नाही.

**ग्रामिण पाणी पुरवठा :-** उप अभियंता श्री.उदय पाटील यांनी ग्रा.पा.पु विभागाचा आढावा खालील प्रमाणे दिला. मागील सभेत मंजूर झालेल्या विंधन विहीरींची माहिती देण्यात आली त्याप्रमाणे ग्रामसेवक आणि प्रशासकांना याबाबत कार्यवाही करण्याचे तसेच विंधन विहरींसाठी केंद्रबिंदू निश्‍चित करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या मात्र ज्यावेळी विंधन विहीर घेण्यासाठी संबंधित वाहन उपकरणांसह आले तेव्हा बऱ्याच ठिकाणी ग्रामपंचायतीचे विंधन विहीर कोठे घ्याव्यात याचे केंद्र बिंदू निश्‍चित करण्यात आले नव्हते तसेच ग्रामसेवक उपस्थित नव्हते परिणामी वाहनांना परत जावे लागले असे त्यांनी सांगितले.

यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दतात्रेय तोंडलेकर यांनी कोणते ग्रामसेवक नव्हते असा प्रश्न विचारला.

त्यावर श्री.उदय पाटिल यांनी वडघर आणि पांगलोलीचे ग्रामसेवक उपस्थित नसल्याचे सांगितले. तसेच इस्टीमेट नुसार फक्त २०० फुट खोलीपर्यंत विंधन विहीर घेऊ नका असे सांगण्यात आल्याचे सांगितले.

यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दतात्रेय तोंडलेकर यांनी २०० फुट खोलीच्या अटीबाबत काही मार्ग काढता येईल का असे विचारले. श्रीवर्धन हा डोंगराळ भाग असल्यामुळे सखल भागाप्रमाणे येथे कमी खोलीवर पाणी लागण्याची शक्यता कमी असल्याचे मत त्यांनी मांडले तसेच विंधन विहीरी घेण्यास मान्यता आहे. या खोलीवर पाणी लागण्याची शक्यता नसल्यामुळे विंधन विहीर घेऊ नका असे संबंधित ग्रा.पंचायतीकडून सांगण्यात आल्याचे सांगितले.

यावर श्री.उदय पाटिल यांनी ग्रामपंचायतीने स्वत: याबाबत गांभीर्याने पाठपुरावा करण्याची गरज असल्याचे सांगितले. १५ व्या आयोगाच्या हेड मध्ये अॅडजस्ट करून यासाठी प्रयत्न करता येऊ शकतात मात्र ग्रा.पं. ने त्यांच्या स्तरावरून पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. तसेच विंधन विहीर खोदाई करणारे वाहन जून महिन्यानंतर उपलब्ध होईल असेही त्यांनी सांगितले.

यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दतात्रेय तोंडलेकर यांनी मंजूर झालेल्या विंधन विहीरी अन्य ठिकाणी घेता येतील का? तसेच जर हा निधी वापरला गेला नाही तर काय होईल असे विचारले.

त्यावर श्री.उदय पाटिल यांनी मंजूर झालेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी विंधन विहीर घेता येणार नाहीत आणि जर हा निधी वापरला गेला नाही तर तो व्यपगत होईल असे सांगितले. यानंतर त्यांनी मेघरे बौध्दवाडी या ठिकाणी असणाऱ्या विहीरीला पाणी लागल्यामुळे पुढील वर्षी या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची टंचाई भासणार नसल्याचे सांगितले. JJM मधील अपुर्ण कामांबद्दल सर्व ठेकेदारांना नोटीस देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

त्यानंतर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर कीर यांनी वाढीव निधीबाबत काही कार्यवाही करण्यात आली आहे का असे विचारले.

यावर श्री.उदय पाटिल यांनी सध्यास्थितीला निधी उपलब्ध नसल्याचे सांगितले.

त्यानंतर मा.सदस्य श्री.सुकुमार दतात्रेय तोंडलेकर यांनी शेखाडी पाणी समस्येबाबत काय कार्यवाही करण्यात येत आहे असे विचारले.

यावर श्री.उदय पाटिल यांनी शेखाडी येथील पाण्याचा स्त्रोत कोरडा पडल्यामुळे त्या ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा सुरू असल्याचे सांगितले तसेच संरक्षक भिंत बांधण्यासाठी एक ठिकाण निश्चित करण्यात आले असून त्या ठिकाणी संरक्षक भिंत बांधल्यास बऱ्याच अंशी पाणी समस्या आगामी वर्षात आटोक्यात येईल असे सांगितले.

त्यानंतर मा.सदस्य श्री.सुकुमार दतात्रेय तोंडलेकर यांनी श्रीवर्धन तालुका हा पाणीटंचाईतून मुक्त करण्यासाठी यथायोग्य प्रयत्न करण्यात यावेत असे सांगितले. बोर्ली पाणी योजनेत फिल्ट्रेशन सुविधा उपलब्ध नाही का असा प्रश्न त्यांनी विचारला.

यावर श्री.उदय पाटिल यांनी याबाबत निश्चित माहिती नसल्यामुळे अंदाजपत्रक पाहून याबाबत माहिती देण्याचे सांगितले.

**<u>लघु पाटबंधारे उप विभाग कोलाड</u>:-** उदय पाटील, अभियंता ग्रा.पा.पु यांनी उप विभागीय लघूपाटबंधारे उप विभाग कोलाड यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला दिला.

**<u>बंदर विभाग:-</u>** बंदर निरीक्षक श्रीवर्धन हे सभेस उपस्थित न राहिल्याने त्यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला घेता आला नाही.

**<u>ल.सिं.(जलसंधारण) माणगांव:-</u>** सहाय्यक अभियंता लघु सिंचन, माणगांव हे सभेस उपस्थित न राहिल्याने त्यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला घेता आला नाही.

**<u>तालुका भूमी अभिलेख :-</u>** उप अधिक्षक भूमी अभिलेख हे सभेस उपस्थित न राहिल्याने त्यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला घेता आला नाही.

**एन.आर.एच.एम. :-** कनिष्ठ लेखाधिकारी एन.आर.एच.एम ता.आ.अ कार्यालय यांनी त्यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला दिला.

**शिक्षण विभाग :-** श्री.रमेश चव्हाण गटशिक्षणाधिकारी यांनी शिक्षण विभागाचा आढावा खाली प्रमाणे दिला.

शिक्षण विभागाला पावसाळ्यात ११००० वृक्ष लागवडीचे लक्ष साध्य करायचे आहे असे त्यांनी सांगितले. यासाठी ग्रामपंचायतीकडून रोपे पुरवण्यात यावीत असे त्यांनी सांगितले. शिक्षण विभागातील रिक्त पदांचा आढावा दिला तसेच शालेय पुस्तक वाटपांचे १००% लक्ष्य साद्य झाल्याचे त्यांनी सांगितले.

यानंतर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर कीर यांनी ग.शि.अ यांच्या कार्यपद्धतीबाबत तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली. पंचायत समितीच्या बैठकिस ग.शि.अ हे उपस्थित असतात मात्र सदस्यांना विचारात घेऊन ते कार्य का करत नाहीत असे त्यांनी विचारले. शाळा सुरू होण्यापुर्वी नियोजनाची बैठक घ्यावी असे स्पष्ट शब्दात सांगितले असतानाही कोणत्याही प्रकारे नियोजन न करता ते शाळा सुरू झाल्यानंतर आल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. तसेच मागील ३ महिण्यात विविध कामानिमित्त ज्या दिनांकांना ग.शि.अ यांनी इतर ठिकाणी हजर असल्याचे सांगितले त्याबाबत जि.प ला पत्र देऊन त्यांची संपुर्ण माहिती त्यांनी द्यावी असे सांगितले.

त्यावर गटशिक्षणाधिकारी हे "होय" असे म्हणाले.

यानंतर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर कीर यांनी शाळा सुरू झाल्यानंतर गणवेश वाटपाचे नियोजन करण्याबाबत ग.शि.अ यांना सूचना दिलेली असताना त्यांना विश्वासात न घेता गणवेश वाटप झाल्याबद्दल नाराजी व्यक्त केली.

यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी तालुक्यात ज्या ठिकाणी गणवेश वाटप झाला आहे त्या शाळेतील संबंधित मुख्याध्यापकांनी तो गणवेश घेऊन दिला आहे की तालुक्यातून इतर कोणी तो पुरवला आहे याबाबत स्पष्टता द्यावी असे सांगितले.

यावर ग.शि.अ यांनी असा कोणताही प्रकार झाला नसल्याचे सांगितले. तसेच असा प्रकार आढळल्यास संबंधितांवर समुचित कारवाई केली जाईल असे सांगितले.

यानंतर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी जून महिना सुरू असला तरी उष्णतेचा पारा अजुन कमी झाला नसल्यामुळे शालेय विद्यार्थ्यांना त्याचा त्रास होत असल्याचे नमुद केले. या त्रासावर पर्याय म्हणून शाळा सकाळच्या सत्रात भरविली जावी असे मत व्यक्त केले व याबाबत त्वरित कार्यवाही करावी असे त्यांनी सांगितले.

यावर ग.शि.अ. यांनी याबाबत त्वरित कार्यवाहीचे आश्वासन दिले.

यानंतर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर कीर यांनी वडवली, दिघी, भरडखोल, कुडगांव या ठिकाणी जास्त पट असुन शिक्षकांची कमतरता आहे त्या ठिकाणी कसे नियोजन केले जाणार असे विचारले.

यावर ग.शि.अ. यांनी संबंधित ठिकाणी गैरसोय होऊ नये म्हणून शिक्षक उपलब्ध करून देण्याचे सर्व प्रयत्न चालू असल्याचे सांगितले.

यानंतर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी श्री.रमेश चव्हाण ग.शि.अ यांना त्यांच्या होणाऱ्या अतिरिक्त कामाच्या त्रासामुळे त्यांचा चार्ज काढला तर चालेल का असे विचारले?

त्यावर श्री.रमेश चव्हाण ग.शि.अ यांनी याबाबत त्यांनी अर्ज केला असून ते स्वत: याबाबत प्रयत्न करत आहेत त्यामुळे चार्ज काढला तर चालेल असे सांगितले.

यानंतर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी मा.सदस्या श्रीम.अस्मिता प्रदर्शन चोरगे यांच्या मागणी प्रमाणे त्यांनी सुचविलेल्या ठिकाणी शिक्षक पुरवला जावा असे सांगितले.

यावर ग.शि.अ हे "होय" म्हणाले.

**शा.पो.आ. :-** श्री.रमेश चव्हाण गटशिक्षणाधिकारी यांनी शालेय पोषण आहाराचा आढावा दिला.

**सर्व शिक्षा अभियान :-** श्री.शेख कनिष्ठ अभियंता हे सभेस उपस्थित न राहिल्याने त्यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला घेता आला नाही.

**<u>ग्राम पंचायत</u> :-** ग्राम पंचायत विभागाचा आढावा श्री. नागे विस्तार अधिकारी यांनी दिला.

मा.सभापती श्री.संचिन नंदाकर कीर यांनी ग्रामपंचायतीला ज्या प्रमाणे बांधकामाचे अधिकार आहेत त्याप्रमाणे पंचायत समितीला आहेत का? असे विचारले.

यावर श्री.किशोर नागे वि.अ.पंचायत यांनी कलम ५२ अंतर्गत असणारे ग्रामपंचायतीचे बांधकामाचे अधिकार काढले असल्याची माहिती दिली. तसेच गावठाणाव्यतिरिक्त बांधकामाचे अधिकार मा.जिल्हाधिकाऱ्यांना आसुन ७/१२ मध्ये कोणतेही बांधकाम मा.जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीने करणे अपेक्षित आसल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर १५ वा वित्त आयोगाच्या २०२३-२४,२०२४-२५,आणि २०२५-२६ सर्व कामांच्या आराखड्यांच्या प्रती आणि गणनिहाय त्या गणातील लोकसंख्या आणि पंचायत समितीला मिळणारे अनुदान ९०% आणि भौगोलिक क्षेत्राप्रमाणे १०% यांच्या प्रती श्री.किशोर नागे यांनी पंचायत समिती सदस्यांना दिल्या.

यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी श्री.किशोर नागे यांना दिलेल्या प्रतीत कामे पुर्ण झाल्याबाबत तसेच ती प्रगतीपथावर असल्याबाबत माहिती दिली आहे का असे विचारले.

यावर श्री.किशोर नागे यांनी निधी आलेला नसल्यामुळे सदर कामे सुरू झाली नसल्याचे सांगितले तसेच निधी आता आला असल्याचे सांगितले ज्या ग्रामपंचायतीमध्ये प्रशासक आहे त्यांचा निधी आला नसल्याचे सांगितले.

यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर कीर यांनी १५ व्या वित्त आयोगामधील कामांमध्ये बदल करण्याचा ठराव द्यावा असे सांगितले.

# सन २०२२-२३ मधील मंजूर कामे

| उपक्रम | अ.क्र | सन २०२२-२३ मध्ये निवडण्यात आलेली कामे/ उपक्रम | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|
| स्वच्छता | १ | दिघी गणात मराठी शाळेकरिता कचराकुंडी खरेदी करणे. | ७०२९१ |
| | २ | शिस्ते मराठी शाळा शौचालय दुरुस्ती करणे | ७०००० |
| | ३ | शेखाडी ऊर्दू शाळा शौचालय दुरुस्ती करणे | ५०००० |
| | ४ | बोर्लीपंचतन प्रदिप खोपकर येथील बंदिस्त गटार बांधणे | २००००० |
| | ५ | खुजारे मन्याचा कोंड गटार बांधकाम करणे | १००००० |
| | ६ | शिस्ते गावात बंदिस्त गटार बांधणे | १९९८८३ |
| | ७ | चिखलप मराठी शाळा शौचालय दुरुस्ती करणे | ७०००० |
| | ८ | हुनेरवली मराठी शाळा शौचालय दुरुस्ती करणे | ५०००० |
| | ९ | भोस्ते मराठी शाळा शौचालय दुरुस्ती करणे | ८५००० |
| | १० | मारळ मराठी शाळा दुरुस्ती करणे | १००००० |
| | ११ | बागमांडला मराठी शाळा शौचालय दुरुस्ती करणे | ६०००० |
| | १२ | बागमांडला ऊर्दू शाळा शौचालय दुरुस्ती करणे | ६०००० |
| | १३ | कोलमांडला मराठी शाळा शौचालय दुरुस्ती करणे | ६०००० |
| | १४ | कोलमांडला ऊर्दू शाळा शौचालय दुरुस्ती करणे | ६०००० |
| | १५ | निगडी मराठी शाळा शौचालय दुरुस्ती करणे | ६०००० |
| | १६ | गालसुरे मराठी शाळा शौचालय दुरुस्ती करणे | ६०००० |
| | १७ | साखरोणे मराठी शाळा शौचालय दुरुस्ती करणे | ५७२४६ |
| | १८ | बोर्ली गणात मराठी शाळेकरिता कचराकुंड्या पुरविणे | ४०३४० |
| | १९ | बागमांडला गणात मराठी शाळेकरिता कचराकुंड्या पुरविणे | ४०३४० |
| | | **एकुण** | **१४९३१००** |
| पाणी पुरवठा | १ | दिघी येथील मराठी मुलगे /मुली शाळा स्वच्छतागृह दुरुस्ती व पाणीपुरवठा करणे. | ३००००० |
| | २ | आदगांव येथील मराठी शाळा स्वच्छतागृह दुरुस्ती व पाणीपुरवठा करणे. | १००००० |

| | | | |
|---|---|---|---|
| | ३ | वडवली येथील मराठी मुलगे /मुली शाळा स्वच्छतागृह दुरुस्ती व पाणीपुरवठा करणे. | ३००००० |
| | ४ | दिवेआगर शाळा नं. २ हॅण्डवॉश व पाण्याची टाकी | ३०००० |
| | ५ | आराठी येथील मराठी शाळा शौचालय दुरुस्ती व पाणीपुरवठा करणे | ८५००० |
| | ६ | भोस्ते अमृत सरोवर तलाव संरक्षण भिंत व सुशोभिकरण करणे | २०३१०० |
| | ७ | रानवली अमृत सरोवर तलाव संरक्षण भिंत व सुशोभिकरण करणे | २२५००० |
| | ८ | हरेश्वर अमृत सरोवर तलाव संरक्षण भिंत व सुशोभिकरण करणे | १५०००० |
| | ९ | शेखाडी येथील शाळा शौचालय दुरुस्ती व पाणी पुरवठा करणे | १००००० |
| | | **एकुण** | **१४९३१००** |
| | | **एकुण (पाणी पुरवठा+स्वच्छता)** | **२९८६२००** |
| १ | | दिघी आदिवासी वाडी समाजमंदिर दुरुस्ती व सुशोभिकरण करणे | २१८७७६ |
| २ | | कुडगांव आदिवासी वाडी समाजमंदिर दुरुस्ती करणे | ११६८२६ |
| ३ | | कार्ले आदिवासी वाडी समाज मंदिर दुरुस्ती करणे | २००००० |
| ४ | | बोर्लीपंचतन सार्वजनिक स्मशानभुमी दुरुस्ती करणे | २०५७८५ |
| ५ | | पुनिर राजिप मराठी शाळा दुरुस्ती करणे | २५०००० |
| ६ | | आराठी ऊर्दू शाळा दुरुस्ती करणे | १३८३५६ |
| ७ | | गालसुरे अदिवासी वाडी स्मशानभुमी चौथरा बांधणे | १००००० |
| ८ | | काळींजे अमृत सरोवर तलाव संरक्षण भिंत व सुशोभिकरण करणे | २६१०५७ |
| ९ | | पंचायत समिती कार्यालय दुरुस्ती करणे | ३५०००० |
| १० | | प्रशासकीय कामकाजाकरीता | १५०००० |
| | | **एकुण** | **१९९०८००** |
| | | **एकूण एकंदर** | **४९७७०००** |

## सन २०२२-२३ मधील मंजूर कामे बदल करणे बाबत

| उपक्रम | अ.क्र | सन २०२२-२३ मध्ये निवडण्यात आलेली कामे/ उपक्रम | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|
| **स्वच्छता** | १ | दिघी गणामध्ये प्राथमिक शाळांना डजबीन पुरविणे | १८८६९९ |
| | २ | वडवली येथे सदानंद खेऊर ते अंगणवाडी गटार बांधणे. | २००००० |
| | ३ | ग्रा.पं. जसवली हायस्कूल ते एकनाथ टाकळे यांचे घरापासून मुख्य रस्त्यापर्यंत गटार बांधणे | ३५४४२० |
| | ४ | बोर्लीपंचतन मनोहर तोडणकर ते उदय लटके घरापर्यंत बंदिस्त गटार बांधणे | २५०००० |
| | ५ | बोर्लीपंचतन नवानगर मेहबूब उल्डे घराशेजारील गटारावर ढापे टाकणे. | १४३०२१ |
| | ६ | ग्रामपंचायत सायगांव येथे गटार बांधणे | २००००० |
| | ७ | ग्रा.पं. साखरोणे खालची आळी येथे गटार बांधणे | १०८९८४ |
| | | **एकुण** | **१४४५१२४** |
| **पाणी पुरवठा** | **१** | दिघी गणतील राजिप शाळांना पाण्याच्या टाक्या पुरविणे. | २००००० |
| | **२** | ग्रामपंचायत वडवली येथील प्राथमिक शाळेची साठवण टाकी दुरुस्ती करणे | १८८६९९ |
| | **३** | नागलोली मुळगांव येथे नळ पाणी पुरवठा योजना करणे | ३५४४२० |
| | **४** | कापोली जावेद जंजिरकर यांचे घरापासून ते निखिल परकर पर्यंत नविन पाईप लाईन व नळ कनेक्शन देणे | १९३०२२ |
| | **५** | शेखाडी बंदर मोहल्ला विंधन विहीर खोदणे | १००००० |
| | **६** | भरडखोल अल्पसंख्यांक मुस्लिम मोहल्ला विंधन विहीर खोदणे | १००००० |

| | | | |
|---|---|---|---|
| | ७ | कारविणे सार्वजनिक विहीरीला पंप व पाईप लाईन करणे | ३०८९८३ |
| | | **एकुण** | **१४४५१२४** |
| | | **एकुण (पाणी पुरवठा+स्वच्छता)** | **२८९०२४८** |
| १ | | वडवली पिळणकर खोती सामाजिक सभागृहाला लादी बसविणे. | २००००० |
| २ | | वडवली भंडारी समाज येथे स्मशानभुमी संरक्षण भिंत बांधणे | २७१११५ |
| ३ | | कोंडविली येथे कुणबी समाज (वरची) विस्तारीकरण करणे | ४२९५६७ |
| ४ | | शेखाडी शकिल दामाद शेजारी पायरी रस्ता बनविणे. | ७०००० |
| ५ | | शिस्ते शरद करंबत ते प्रितमसिंग पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता बनविणे | १००००० |
| ६ | | बोर्लीपंचतन बुरुडआळी अंतर्गत रस्ता तयार करणे | २००००० |
| ७ | | बोर्लीपंचतन गजानन गायकर सुजित शिसतकर अंतर्गत रस्ता तयार करणे | १०६३५४ |
| ८ | | कारविणे गाव येथील चोरगे ग्रामस्थ मंडळ सभागृह दुरुस्ती करणे | ८५००० |
| ९ | | ग्रामपंचायत गाणी अंतर्गत रस्ता तयार करणे | १२५००० |
| १० | | ग्रामपंचायत कारीवणे कोंड येथे स्मशान शेड बांधणे. | १६४४९७ |
| ११ | | प्रशासकीय कामाकाजाकरिता १०% | १९४६१५ |
| | | **एकुण** | **१९४६१४८** |
| | | **एकूण एकंदर** | **४८३६३९६** |

# सन २०२३-२४ मधील मंजूर कामे

| उपक्रम | अ.क्र | सन २०२३-२४ मध्ये निवडण्यात आलेली कामे/ उपक्रम | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|
| स्वच्छता | १ | ग्रामपंचायत दिघी नानवली येथील श्री.चंद्रकांत हांडे ते श्री.विजय शिवणे यांच्या घरार्यंत गटार बांधणे | १००००० |
| | २ | ग्रामपंचायत कुडगांव येथील श्री.काशिम परकार ते नाझीम वनवारे कंपाऊड पर्यंत गटार बांधणे. | १००००० |
| | ३ | ग्रामपंचायत वेळास येथील श्री.गजानन महाडीक ते श्री.शंकर काते यांच्या घरार्यंत गटार बांधणे | १००००० |
| | ४ | ग्रामपंचायत वडवली येथील श्री.नामदेव रोटकर यांच्या घरसमोरील गटार बांधणे | १००००० |
| | ५ | ग्रामपंचायत वेळास येथील वेळास आगर अंगणवाडी शौचालय दुरुस्ती करणे | ४१७९८ |
| | ६ | ग्रामपंचायत हरवित अंगणवाडी शौचालय दुरुस्ती करणे | ५०००० |
| | ७ | ग्रामपंचायत शिस्ते येथील कापोली अंगणवाडी शौचालय दुरुस्ती करणे | ५०००० |
| | ८ | ग्रामपंचायत खुजारे रा.जि.प.मराठी शाळा शौचालय दुरुस्ती करणे | ५०००० |
| | ९ | ग्रामपंचायत भरडखोल येथील श्री.गोमाई कालेकर यांच्या घरासमोरील गटार बांधणे | १००००० |
| | १० | ग्रामपंचायत कार्ले मोहल्ला येथील श्री.मुश्ताक धनसे ते मशिदीपर्यंत गटार बांधणे | १००००० |
| | ११ | ग्रामपंचायत वांजळे बौध्दसमाज मंदीर पासुन रस्त्यालगत गटार बांधणे | १००००० |
| | १२ | ग्रामपंचायत गालसुरे येथिल बापवन अंगणवाडी शौचालय दुरुस्ती करणे. | ६०००० |
| | १३ | ग्रामपंचायत वडघर येथिल वडघर पांगलोली अंगणवाडी शौचालय दुरुस्ती करणे. | ६०००० |
| | १४ | ग्रामपंचायत रानवली येथील बौध्दवाडी येथे श्री.सुभाष यादव ते रविंद्र मोरे यांच्या घरार्यंत गटार बांधणे | १००००० |

| | | | |
|---|---|---|---|
| | १५ | ग्रामपंचायत जसवली बौध्दवाडी येथील नाल्याला संरक्षण भिंत बांधणे. | १६१३०२ |
| | १६ | ग्रामपंचायत निगडी येथील अंगणवाडी शौचालय दुरुस्ती करणे. | ६०००० |
| | १७ | ग्रामपंचायत कोलमांडला येथील रा.जि.प.मराठी शाळा शौचालय दुरुस्ती करणे. | ६०००० |
| | १८ | ग्रामपंचायत सायगांव येथील श्री.अंनत लाड यांच्या प-याकडे जाणारा गटार बांधणे | १००००० |
| | | **एकुण** | **१४९३१००** |
| **पाणी पुरवठा** | १ | ग्रामपंचायत वेळास येथील रा.जि.प.मराठी शाळा येथे पाण्याची टाकी व हॅण्डवॉश बसविणे. | १००००० |
| | २ | ग्रामपंचायत आदगांव येथील रा.जि.प.मराठी शाळा येथे पाण्याची टाकी व हॅण्डवॉश बसविणे. | १००००० |
| | ३ | ग्रामपंचायत सर्वे येथील रा.जि.प.मराठी शाळा येथे पाण्याची टाकी व हॅण्डवॉश बसविणे. | १००००० |
| | ४ | ग्रामपंचायत शिस्ते येथील समतानगर नळपाणी पुरवठा योजना पाईप लाईन दुरुस्ती करणे | २५०८२० |
| | ५ | ग्रामपंचायत चिखलप येथील रा.जि.प.मराठी शाळा येथे पाण्याची टाकी व हॅण्डवॉश बसविणे. | १००००० |
| | ६ | ग्रामपंचायत मारळ येथे विंधण विहीर खोदाई करणे | १००००० |
| | ७ | ग्रामपंचायत दांडा येथील काटकवाडी विहीरवर इलेक्ट्रीक पंप व संरक्षण जाळी बसविणे. | १४५८६४ |
| | ८ | ग्रामपंचायत काळिंजे येथे विंधण विहीर खोदाई करणे | १००००० |
| | ९ | ग्रामपंचायत नागलोली येथील बोर्ला येथे विंधण विहीर खोदाई करणे | १००००० |
| | १० | ग्रामपंचायत शिस्ते येथील रा.जि.प.मराठी शाळेला हॅण्डवॉश बसविणे | ६०००० |
| | ११ | ग्रामपंचायत शेखाडी येथील रा.जि.प.मराठी शाळेला हॅण्डवॉश बसविणे | ६०००० |
| | १२ | ग्रामपंचायत नागलोली येथील अमृत सरोवर तलावास संरक्षण भिंत बांधणे | २७६४१६ |
| | | **एकुण** | **१४९३१००** |
| | | **एकुण (पाणी पुरवठा+स्वच्छता)** | **२९८६२००** |
| १ | | ग्रामपंचायत दिघी येथील आदीवासीवाडी येथे सौर पथदिवे बसविणे. | ५०००० |
| २ | | ग्रामपंचायत कुडकी येथील आदीवासीवाडी येथे सौर पथदिवे बसविणे. | ५०००० |
| ३ | | ग्रामपंचायत कुडगांव येथील आदीवासीवाडी येथे सौर पथदिवे बसविणे. | ५०००० |
| ४ | | ग्रामपंचायत आदगावं येथील कोळीवाडा अंगणवाडी येथे संरक्षण भिंत व पाय-या बाधणे. | ३११५७७ |
| ५ | | ग्रामपंचायत शेखाडी येथील धुण्याची विहीर दुरुस्ती व संरक्षण भिंत बांधणे. | २००००० |
| ६ | | ग्रामपंचायत वांजळे येथील वाघजाई मंदीरापासुन गटार बांधकाम करणे. | २४९३४८ |
| ७ | | ग्रामपंचायत खारगांव येथील कोंडवील बौध्दवाडीकडे जाणारा रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | २३००५१ |
| ८ | | ग्रामपंचायत भोस्ते विहीरीजवळ पक्का बंधारा बांधणे. | २००००० |
| ९ | | ग्रामपंचायत काळींजे येथील मराठा समाजमंदीर दुरुस्ती करणे. | १५०००० |
| १० | | ग्रामपंचायत मारळ स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १४९८२४ |
| ११ | | ग्रामपंचायत काळींजे येथील स्मशानभूमी सुशोभिकरण करणे. | १००००० |
| १२ | | प्रशासकीय कामकाजाकरीता | २५०००० |
| | | **एकुण** | **१९९०८००** |
| | | **एकूण एकंदर** | **४९७७०००** |

# सन २०२३-२४ मधील मंजूर कामे बदल करणे बाबत

| उपक्रम | अ.क्र | सन २०२३-२४ मध्ये निवडण्यात आलेली कामे/ उपक्रम | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|
| स्वच्छता | १ | ग्रामपंचायत वडवली अंतर्गत बंदिस्त गटार करणे | ३९६५२३ |
| | २ | ग्रा.पं. वाळवटी स्वप्निल नेवरेकर ते मुख्य रस्त्यापर्यंत गटार | ३६१५५४ |
| | ३ | बोर्लीपंचतन रत्नाकर दिवेकर यांचे घरासमोरील गटारावर ढापे टाकणे | १००००० |
| | ४ | बोर्लीपंचतन गणेश प्रभाळे यांचे घरासमोरील गटारावर ढापे टाकणे | ५०००० |
| | ५ | बोर्लीपंचतन केशव गाणेकर ते रमेश शंकर पाटील घरापर्यंत बंदिस्त गटार बांधणे | २५०८८३ |
| | ६ | बागमांडला गणात ग्रामपंचायतींना कचराकुंडी पुरविणे | १००००० |
| | ७ | ग्रामपंचायत हरेश्वर अंतर्गत गटार बांधणे | २१५२०४ |
| | | **एकुण** | **१४७४१६४** |
| पाणी पुरवठा | १ | वेळास आगर येथे शाळेची पाईपलाईन दुरुस्ती करणे | १०३१७७ |
| | २ | वेळास आगर येथील प्राथमिक शाळेला पाण्याची साठवण टाकी बांधणे | २९३३४७ |
| | ३ | नागलोली मुळगांव येथे नळ पाणी पुरवठा योजना उर्वरीत काम करणे | ३६१५५४ |
| | ४ | कापोली जगदंबा मंदिर नाल्याला संरक्षण भिंत बांधणे | २००००० |
| | ५ | वांजळे तलावाला संरक्षण भिंत बांधणे | २००८८३ |
| | ६ | ग्रामपंचायत काळींजे अंतर्गत पाईपलाईन दुरुस्ती करणे | ११५२०३ |
| | ७ | ग्रामपंचायत गाणी कोंड अंतर्गत पाईप लाईन दुरुस्ती करणे | २००००० |
| | | **एकुण** | **१४७४१६४** |
| | | **एकुण (पाणी पुरवठा+स्वच्छता)** | **२९४८३२८** |
| १ | | ग्रामपंचायत आदगांव येथील कुणबी समाज अंतर्गत गटार बांधणे | २००००० |
| २ | | ग्रा.पं. आदगांव येथील भंडारी समाज सामाजिक सभागृहाला लादी बसविणे | २७५८३० |
| ३ | | ग्रा.पं. चिखलप शिरवणे येथे महादेव चिमण ते शितल जाधव घराकडे जाणारा रस्ता डांबरीकरण करणे | ४३३८६३ |
| ४ | | बोर्लीपंचतन लियाकत उल्डे ते महारुख चोगले घरापर्यंत रस्ता करणे | १००००० |
| ५ | | बोर्लीपंचतन सदानंद धनावडे ते मंगेश पयेर घरापर्यंत रस्ता तयार करणे | ३८११२१ |
| ६ | | चोरगे स्मशानभुमी येथे तारेचे कुंपण करणे | ३७८२४५ |
| ७ | | प्रशासकीय कामाकाजाकरिता खर्च १०% | १९६५६६ |
| | | **एकुण** | **१९६५६२५** |
| | | **एकूण एकंदर** | **४९१३९५३** |

# सन २०२४-२५ मधील मंजूर कामे

| उपक्रम | अ.क्र | सन २०२४-२५ मध्ये निवडण्यात आलेली कामे/ उपक्रम | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|
| स्वच्छता | १ | दिघी गणातील ग्रामपंचायतीस दुर्गंधी सेवक निर्जंतूकीकरण औषध पुरविणे | १०६१२६ |
| | २ | ग्रा.पं. कुडगांव बौध्दवाडी विहीरीलगत गटाराला संरक्षण भिंत बांधणे | १००००० |
| | ३ | ग्रा.पं. वेळास कार्यालयास शौचालय बांधणे | १००००० |
| | ४ | ग्रा.पं. हरवीत कार्यालयास शौचालय बांधणे | १००००० |
| | ५ | बोर्ली पंचतन गणातील ग्रामपंचायतीस दुर्गंधी सेवक निर्जंतूकीकरण औषध पुरविणे | १५०००० |
| | ६ | ग्रा.पं. खुजारे कार्यालय शौचालय बांधकाम करणे | १२२६८३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | ७ | ग्रा.पं. वांजळे कार्यालय शौचालय बांधकाम करणे | १२२८८३ |
| | ८ | वाळवटी गणातील ग्रामपंचायतीस दुर्गंधी सेवक निर्जंतूकीकरण औषध पुरविणे | १५०००० |
| | ९ | ग्रा.पं. आराठी मेटकर्णी नाल्याला संरक्षण भिंत बांधणे | १००००० |
| | १० | ग्रा.पं. नागलोली धनगरमलई अंगणवाडीस शौचालय बांधणे | १२८३२० |
| | ११ | बागमांडला गणातील ग्रामपंचायतीस दुर्गंधी सेवक निर्जंतूकीकरण औषध पुरविणे | १५०००० |
| | १२ | ग्रा.पं. गालसुरे कुंभार समाज विहीरीकडे जाणाऱ्या रस्त्यालगत गटार बांधणे | १०१७८८ |
| | १३ | ग्रा.पं. मारळ राजेंद्र मळेकर यांच्या घरापासून जाणारा गटार बांधणे | १००००० |
| | १४ | ग्रा.पं. कोलमांडला रा.जि.प.शाळा कोलमांडला शौचालय बांधणे | ३०६३६० |
| | | **एकुण** | **१८३८१६०** |
| | १ | ग्रा.पं. दिघी रा.जि.प. मराठी शाळा साठवण टाकी व हॅण्डवॉश बांधणे | १००००० |
| | २ | ग्रा.पं. आदगांव रा.जि.प. मराठी शाळा साठवण टाकी व हॅण्डवॉश बांधणे | १००००० |
| | ३ | ग्रा.पं. सर्वे रा.जि.प. मराठी शाळा साठवण टाकी व हॅण्डवॉश बांधणे | १००००० |
| | ४ | ग्रा.पं. वडवली राजि.प. मराठी शाळा येथे साठवण टाकी बांधणे | १०६१२२ |
| | ५ | ग्रा.पं. शेखाडी गावंदड विहीर संरक्षण भिंत व दुरुस्ती करणे | २००००० |
| | ६ | ग्रा.पं. बोर्ली पंचतन रा.जि.प. कन्याशाळा हॅण्डवॉश बांधणे | ९५५०० |
| | ७ | ग्रा.पं. शिस्ते हद्दीत बोअरवेल मारणे | १००००० |
| **पाणी पुरवठा** | ८ | ग्रा.पं. खारगांव बौध्दवाडी विंधन विहीर बांधणे | १००००० |
| | ९ | ग्रा.पं. जसवली रा.जि.प. मराठी शाळा हॅण्डवॉश बांधणे | १००००० |
| | १० | ग्रा.पं. चिखलप हुनेरवेली न.पा.पु. योजनेस विद्युत कनेक्शन करणे | १७८३८८ |
| | ११ | ग्रा.पं. दांडा काटकवाडी विहीर दुरुस्ती व संरक्षण भिंत बांधणे | १००००० |
| | १२ | ग्रा.पं. काळींजे व कुरवडे न.पा.पु. योजनेस विद्युत कनेक्शन करणे | २५१७९० |
| | १३ | ग्रा.पं. नागलोली बोर्ले येथे वैयक्तिक नळ कनेक्शन देणे | १५०००० |
| | १४ | ग्रा.पं. चिखलप हुनेरवेली येथे वैयक्तिक नळ कनेक्शन देणे | १५०००० |
| | | **एकुण** | **१८३१८००** |
| | | **एकुण (पाणी पुरवठा+स्वच्छता)** | **३६६९९६०** |
| **१** | | ग्रा.पं. कुडगांव रोहिदास वाडी व बौध्दवाडी येथे सौर पथदिवे बसविणे | १००००० |
| **२** | | ग्रा.पं. कुडगांव गणेश किसन पवार ते परशुराम घासरे घरापर्यंत रस्ता करणे | १५०००० |
| **३** | | ग्रा.पं दिघी गंगा सुधीर पाटील ते राहिदास गिरणेकर घरापर्यंत रस्ता करणे. | २३७३५१ |
| **४** | | ग्रा.पं. शेखाडी स्मशानशेड बांधणे | १२४४३९ |
| **५** | | ग्रा.पं. दिवेआगर कोळीवाडा स्मशानशेड बांधणे | १५०००० |
| **६** | | ग्रा.पं. बोर्लीपंचतन बुरुड समाजमंदिर सुशोभिकरण करणे | २००००० |
| **७** | | ग्रा.पं. चिखलप स्मशानशेड बांधणे | १००००० |
| **८** | | ग्रा.पं. चिखलप हुनेरवेली वरची वाडी स्मशानशेड बांधणे | १००००० |
| **९** | | ग्रा.पं. नागलोली मुळगांव दुदुस्कर ते प्रकाश खांडेकर घरापर्यंत रस्ता पेव्हर ब्लॉक करणे | १५०००० |
| **१०** | | ग्रा.पं. नागलोली नविवाडी किसन महाडीक ते दिलीप महाडीक घरापर्यंत रस्ता करणे | १०४०४० |
| **११** | | ग्रा.पं. मारळ रा.जि.प. शाळा बाणगंगा सोलर पॅनल बसविणे | १००००० |
